# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, (दक्षिण कक्ष) बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
दूरध्वनी : २७५७१६७३, २७५७०१६६, २७५७१६७७, २७५७८४०९
फॅक्स : २७५७ ०९६१, २७५७ १६६६.
वेबसाईट : mahamjp.com


क्र.मजीप्रा/२०१२/सभा-१२५/(१००)/आ.४ /९७४ दिनांक :३१.१०.२०१२

प्रति,

१) मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

२) मा.मंत्री, ग्राम विकास तथा प्राधिकरणाचे सह अध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

३) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

४) मा.राज्यमंत्री, नगर विकास तथा प्राधि.चे उपाध्यक्ष, मंत्रालय, मुंबई.

५) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

६) प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

७) प्रधान सचिव (उर्जा) उद्योग, उर्जा कामगार विभाग, तथा प्राधि.चें सदस्य, मंत्रालय, मुंबई.

८) अप्पर मुख्य सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग तथा प्राधि.चे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

९) प्रधान सचिव, (२) नगर विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

१०) सचिव, ग्राम विकास विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य, मंत्रालय, मुंबई.

११) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई-२१.

विषय : दि.२०.९.२०१२ रोजी झालेल्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२५व्या सभेचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या गुरुवार दि.२०.९.२०१२ रोजी झालेल्या १२५व्या सभेचे इतिवृत्त आपले माहितीसाठी यासोबत सादर करण्यांत येत आहे.

सोबत : १२५ व्या सभेचे इतिवृत्त
पृ.क्र. १ ते १०

आपला विश्वासू,

(वि.कृ.साठे)
मुख्य प्रशासकीय अधिकारी

125meeting

MJP Received 31/10/12

प्रत :

१. मुख्य अभियंता, म.जी.प्रा. जलव्यवस्थापन, ठाणे,/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार सेवा, पुणे, /अद्ययावत तंत्रज्ञान सहाय्य, नाशिक, /नागरी व ग्रामीण योजना, ठाणे / मध्यवर्ती नियोजन, मित्तल टॉवर्स, मुंबई.
आपल्या संबंधित असलेल्या कार्यक्रम बाबींवर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

2. वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई,
वित्त व लेखा शाखेशी संबंधित असलेल्या आयत्यावेळची कार्यक्रम बाब क्र.२ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

3. अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा., एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.६,७,८ व आयत्या वेळेची कार्यक्रम बाब क्र.१ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

4. अधीक्षक अभियंता (यांत्रिकी) म.जी.प्रा. ठाणे / नागपूर.

5. उप मुख्य लेखा अधिकारी (१) व (२) मजीप्रा., नवी मुंबई.

6. उप सचिव, पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई ३२,

7. आस्थापना अधिकारी (दक्षता) मजीप्रा, नवी मुंबई,
आपल्या विभागाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.१,२,३, ४ व ५ वर कार्यवाही करुन कार्यपुर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

8. उप अभियंता, आय.टी.सेल, मित्तल टॉवर्स, मुंबई .

9. प्रशासकीय नि आस्थापना अधिकारी, मजीप्रा, सिडको भवन, नवी मुंबई,

10. कायदा व कामगार अधिकारी, म.जी.प्रा., नवी मुंबई.

11. मध्यवर्ती कार्यालयातील सर्व कक्ष अधिकारी (आस्थापना- )/कार्यासन अधिकारी (आ- ) यांच्या माहितीसाठी व कार्यवाहीसाठी

12. सर्व लेखा अधिकारी, म.जी.प्रा., सिडको भवन, नवी मुंबई.

13. व्यवस्थापक, स्थावर मालमत्ता कक्ष (आ-९) सिडको भवन, नवी मुंबई.
आपल्या कार्यासनाशी संबंधित असलेल्या कार्यक्रम बाब क्र.३,४,५ व आयत्या वेळेची चर्चा यावर कार्यवाही करुन कार्यपूर्तीचा अहवाल त्वरीत सादर करावा.

सर्व संबंधितांनी कार्यपूर्ती अहवाल दि.५.११.२०१२ पर्यत सादर करावा.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२५ व्या सभेचे इतिवृत्त

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची १२५ वी सभा मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा म.जी.प्रा.चे पदसिध्द अध्यक्ष, मा.श्री.लक्ष्मण ढोबळे यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार दिनांक २०/०९/२०१२ रोजी दुपारी ३.०० वाजता संपन्न झाली. या सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील सदस्य उपस्थित होते:-

१. मा.ना.श्री. लक्ष्मण ढोबळे, मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष.
२. मा.ना.श्री.रणजित कांबळे, मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष.
३. मा.प्रधान सचिव, पा.पु. व स्व. विभाग तथा प्राधिकरणाचे सदस्य पा.पु. व स्व. विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
४. मा.प्रधान सचिव, (वित्तीय सुधारणा) वित्त विभाग, तथा प्राधिकरणाचे सदस्य यांच्या वतीने श्री.शि. म. म्हात्रे, उप सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई, ४०००३२.
५. राधेश्याम मोपलवार, सदस्य सचिव, म.जी.प्रा. मुंबई ४०००३२.

या व्यतिरिक्त सदर सभेस महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे खालील अधिकारी तसेच इतर विभागाचे पदाधिकारी उपस्थित होते:-

१. श्री.पंजाबराव वानखेडे, मुख्य प्रशासकीय अधिकारी, मजीप्रा, मुंबई.
२. श्री. हेमंत लांडगे, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., नागरी व ग्रामीण योजना, ठाणे.
३. श्री. एन.एस.केरकर, मुख्य अभियंता, म.जी.प्रा., जलव्यवस्थापन, ठाणे.
४. श्री. बी.के.सवाई, मुख्य अभियंता, मध्यवर्ती नियोजन, मुंबई.
५. श्री.सुधाकर डांगे, वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी, म.जी.प्रा. मुंबई,
६. श्री.नरेंद्र तेजाळे, अधीक्षक अभियंता (यां.) मजीप्रा, नागपूर,
७. श्री. एस.बी.भुजबळ, अधीक्षक अभियंता (समन्वय) म.जी.प्रा.एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई.

मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरूवात झाली.

**कार्यक्रम बाब क्र.१:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४ व्या सभेच्या प्रारुप इतिवृत्तास मान्यता देणे.

दिनांक १४.८.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२४ व्या सभेच्या इतिवृत्तास सर्वसाधारण चर्चेनंतर मान्यता देण्यात आली.

**कार्यक्रम बाब क्र.२:**

**विषय:** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या १२४ व्या सभेतील निर्णयावर करण्यांत आलेली कृती.

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या दिनांक. १४.८.२०१२ रोजी संपन्न झालेल्या १२४ व्या बैठकीमध्ये जे निर्णय घेण्यात आले. त्याबाबत सविस्तर चर्चा करणेत आली.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

तसेच निर्णयाच्या अनुषंगाने करण्यांत आलेल्या कार्यवाहीचा अहवाल पुढील बैठकीत संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करणेबाबतचा निर्णय घेण्यांत आला. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात आले.

**कार्यक्रम बाब क्र.३:**

**विषय:** म.जी.प्रा.च्या मालकीच्या नवीन मुंबई (वाशी, नेरुळ, सी.बी.डी.) परिसरातील विखुरलेली व रिक्त निवासस्थानांची निविदेव्दारे विक्रिची कार्यवाही पुर्ण झाली असनू सदर निवासस्थानांचे अंतीमतः वाटप करण्यापुर्वी म.जी.प्रा.च्या संचालक मंडळाची मान्यता घेणे.

सदर कार्यक्रम बाबीचे मुख्य अभियंता (ना.व ग्रा.) यांनी संचालक मंडळासमोर "Power Point" सादरीकरण केले. तद्नंतर कार्यक्रम बाबीबाबत मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले की, नवी मुंबई (वाशी, नेरुल व सी.बी.डी.) येथील म.जी.प्रा.च्या रिक्त व विखुरलेली निवासस्थाने निविदाद्वारे विकण्याबाबतचा ठराव संचालक मंडळाच्या १२२ व्या बैठकीत पारीत झालेला आहे. त्यानुसार ५२ निवासस्थाने निविदाद्वारे विकण्याची कार्यवाही कार्यकारी अभियंता, माणगांव यांनी पूर्ण करुन निविदा तपासणी समितीकडे अहवाल सादर केला. या समितीनी निविदा अटी व शर्तीच्या अनुषंगाने व तसेच निवासस्थान विक्री संदर्भात प्राप्त अर्ज/तक्रारीनुसार छाननी करुन ५२ निवासस्थानांपैकी ४९ निवासस्थाने विक्रीस व उर्वरीत ३ निवासस्थानांची विक्री फेर निविदाद्वारे करण्याची शिफारस केली आहे. समितीकडून प्राप्त शिफारसीनुसार निवासस्थाने विक्रीची ही कार्यक्रम बाब अंतिम मान्यतेसाठी संचालक मंडळासमोर ठेवण्यात आली आहे. यावर सविस्तर चर्चा झालेनंतर सदर कार्यक्रम बाबीस मान्यता देण्यात येऊन खालील प्रमाणे ठराव पारीत करण्यात आला.

ठराव :

असा ठराव करण्यात येतो की, निविदा तपासणी समितीने शिफारस केलेल्या नवी मुंबई (वाशी, नेरुल व सी.बी.डी.) येथील म.जी.प्रा.च्यामालकीच्या ४९ सदनिका विक्री करणेबाबतच्या प्रस्तावास अंतिम मान्यता देण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाहीस सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

उर्वरीत ३ सदनिकांचे विक्रीसाठी फेर निविदाची यथा योग्य वेळी कार्यवाही करुन संचालक मंडळाचे अंतिम मान्यतेसाठी अहवाल सादर करावा.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

**कार्यक्रम बाब क्र.४:**

**विषय:** अंधेरी, मुंबई येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करणे.

सदर कार्यक्रम बाबीचे संचालक मंडळासमोर ‘‘Power Point‘‘ सादरीकरण करण्यात आले. मा.सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास विषद केले की, ज्या जागा/भूखंड विनावापर पडून आहेत त्या ठिकाणी अतिक्रमण ही थांबविण्यासाठी व त्यातून कायमचे उत्पन्न मिळण्यासाठी त्या जागा/‘‘भूखंड बांधा वापरा व हस्तांतरीत करा‘‘ या तत्वावर विकास करण्याची शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले आहे. त्यानुसार अंधेरीचा बी.ओ.टी. प्रस्ताव कार्यक्रम बाबीद्वारे मा.संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा.सदस्य सचिव यांनी मंडळास अवगत केले.

सदर प्रस्तावावर चर्चा करताना मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा प्राधिकरणाचे उपाध्यक्ष यांनी असे नमुद केले की, दोन चटई क्षेत्र निर्देशांक प्रमाणे अंधेरी येथे ३६०० चौ.मी. बांधकामात म.जी.प्रा.ने ७२० चौ.मी. क्षेत्र स्वत:साठी प्रस्तावित केले असून या जागेचा अधीमुल्य (Premium) कमीत कमी रुपये ७.०० कोटी मिळेल असे प्रस्तावावरुन दिसते. सदरचा अधीमुल्य दुय्यम निबंधकाचे चालू मुल्य दरतक्ता (Ready Reckoner) सन २०१२ नुसार काढण्यात आलेले आहे. परंतु बाजारात प्रत्यक्ष व्यवहारातील बाजारमुल्य (Current Market Price) बऱ्याच वेळा हे Ready Reckoner पेक्षा जास्त असतात त्यामुळे निविदा काढताना Premium ची प्रस्तावित रक्कम कमीत कमी रुपये ७.०० कोटीच्या ऐवजी रुपये १५.०० कोटीची ठेवावी. तसेच विकास नियंत्रण नियमावलीनुसार (D.C.Regulation) सदर जागेवर ४ चटई क्षेत्र निर्देशांक मिळू शकतो. त्यामुळे जर विकासकाना प्रस्तावित २.० चटई क्षेत्र निर्देशांका ऐवजी वाढीव (३ किंवा ४) चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर करुन घेतला तर अशा वाढीव बांधकामामध्ये म.जी.प्रा.चा हिस्सा (Share) ५०% राहील व अशा प्रकारच्या वाढीव बांधकामासाठी लागणारा सर्व खर्च हा विकासकांनी भरावयाचा आहे. ह्या अटी व शर्ती निविदेत समाविष्ठ करण्याचे सूचीत केले. तर मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी सदर जागेचा वापर व आरक्षणाबाबत पुन्हा तपासणी करुन खातरजमा/शहानिशा करण्याची गरज असल्याचे व तशी शासनाची परवानगी घेणे बाबत सूचना केली.

उपरोक्त मुद्यास मा.अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, अंधेरी, मुंबई येथील भूमापन क्र.२२७-अ- या भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर खाजगी विकासकाच्या सहभागाने विकास करण्याच्या प्रस्तावास प्रथम शासनाची मान्यता घ्यावी आणि त्यानंतर चर्चेत उपस्थित केलेल्या मुद्यानुसार अटी व शर्ती समाविष्ट करुन निविदा काढाव्यात.

| | |
|---|---|
| **मा.अध्यक्ष तथा मंत्री<br>पाणी पुरवठा व स्वच्छता** | **सदस्य सचिव,<br>म.जी.प्रा.** |

(६)

**कार्यक्रम बाब क्र.५:**

**विषय:** मौजे पनवेल तक्ता येथील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या ताब्यातील भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर विकास करणे.

सदर कार्यक्रम बाबीचे संचालक मंडळासमोर "Power Point" द्वारे सादरीकरण संचालक मंडळाच्या समोर करण्यात आले. सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी अंधेरी प्रमाणेच जागेचे आरक्षण (Reservation) व वापर (Utilizations) ची तपासणी करुन तसेच अधीमुल्य Premium ची रक्कम ८.३२ कोटीच्या ऐवजी वाढवून रुपये १७.८८ कोटी ठेवणे असे सूचित करण्याचे निर्देशीत केले व गरज भासल्यास शासनाची परवानगी घेणे बाबत सूचना केली.

उपरोक्त मुद्दयास मा.अध्यक्ष व सर्व उपस्थित सदस्यांनी सहमती दर्शविली.

**ठराव :**

असा ठराव करण्यात येतो की, मौजे पनवेल तक्का येथील भूमापन क्र.४२२-अ, १अ(१) व भूमापन क्र.४२३-१अ, सी.टी.एस. क्र.२९१ या भूखंडाचा बांधा, वापरा व हस्तांतर करा या तत्वावर खाजगी विकासकाच्या सहभागाने विकास करण्याच्या प्रस्तावास प्रथम शासनाची मान्यता घ्यावी आणि त्यानंतर चर्चेत उपस्थित केलेल्या मुद्यानुसार अटी व शर्ती समाविष्ट करुन निविदा काढाव्यात.

**कार्यक्रम बाब क्र.६:**

**विषय:** म.जी.प्रा. मार्फत चालविण्यांत येत असलेल्या पाणी पुरवठा केंद्रावर लागणा-या जलमापकांचा एकत्रित पुरवठा करणेबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा. संचालक मंडळास अवगत केले.

म.जी.प्रा. चालवित असलेल्या पाणी पुरवठा केंद्रे व प्रादेशिक पाणी पुरवठा योजनांपैकी प्राधान्याने सध्या नागरी पाणी पुरवठा केंद्रांतर्गत जेथे जलमापके नाहीत त्या सर्व ग्राहकांच्या नळ जोडणीवर जलमापके बसविणे प्रस्तावित आहे. सध्या बाजारामध्ये प्रामुख्याने ISI व EEC (European Economic Community) प्रमाणपत्र प्राप्त जलमापके उपलब्ध आहेत. म.जी.प्रा.च्या एकंदरित सर्वसाधारण अनुभवावरुन इतर जलमापकापेक्षा EEC जलमापके जास्त टिकाऊ व योग्य मोजमाप नोंदविणारी आहेत, असे आढळून आले आहे. त्यामुळे सदर पाणी पुरवठा केंद्रांतर्गत आवश्यकतेनुसार EEC जलमापके नळजोडण्यांवर बसविण्याचे प्रस्तावित आहे.

क्षेत्रिय कार्यालयांकडून प्राप्त झालेल्या माहितीनुसार, नागरी पाणी पुरवठा केद्रांना सद्य:स्थितीत १५ ते ९०० मि.मी. व्यासाची एकूण ८०,९५६ जलमापके आवश्यक आहेत. सदर जलमापकांची परिगणीत केलेली परिमाणे ही सध्या प्राप्त माहितीवर असून, भविष्यात वाढणारी आहेत. यामध्ये बहुतांश वाढणारी परिमाणे किरकोळ म्हणजेच १५ मि.मी.व्यासाची असतील.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

मात्र सद्यःस्थितीत केवळ १५ मी.मी. ते ४० मी.मी. व्यासापर्यंतची एकूण ८०,७०२ जलमापके ही एकत्रित करुन एकाच निविदेद्वारे खरेदी करणे योग्य रहाणार असल्याने, तसे प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर जलमापकांची खरेदी व बसविण्यासाठी एकूण रु.१७.८२ कोटी निव्वळ इतका खर्च अपेक्षित आहे. या ८०,७०२ जलमापकांपैकी ७८,४४४ जलमापके ही REMOTE READING सुविधा नसलेली व २२५८ जलमापके ही REMOTE READING अशी सुविधा असलेली खरेदी करण्याचे प्रस्तावित आहे.

REMOTE READING अशी सुविधा असलेली जलमापके बसविण्यासाठी आवश्यक अशी उपकरणे (Cyble, मापनाची नोंद घेणारे hand held unit त्याचप्रमाणे त्याची नोंद घेण्यासाठी आवश्यक संगणक प्रणाली) घ्यावी लागणार आहेत. यासाठी अधिकचा अंदाजे रु.१.७२ कोटी निव्वळ इतका खर्च अपेक्षित आहे. सदरचा दोन्ही बाबींचा एकूण ढोबळ रु.२२.७९ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे.

सदरची जलमापके पुरवठा करुन घेण्यासाठी येणारा खर्च हा महाराष्ट्र सुजल निर्मल कार्यक्रमांतर्गत उपलब्ध निधीतून भागवावा असे प्रस्तावित करण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत यापूर्वी मंजूर १८ पाणी पुरवठा केंद्रांतर्गत ठोक जलमापकांसाठी रु. ६.१९ कोटी तरतूद असून, त्यापैकी रु. ३.९८ कोटी इतका खर्च झाला आहे. त्यामुळे उर्वरित तरतूद ही रु. २.२१ कोटी इतकी आहे. त्यामुळे जलमापक खरेदीसाठी एकूण अपेक्षित खर्च रु. २२.७९ कोटीमधून उपलब्ध होणारी रु.२.२१ कोटी रक्कम वजा जाता रु.२०.५८ कोटी इतकी तरतूद नव्याने करावी लागणार आहे.सबब, सदर प्रस्तावास मान्यता प्रदान झाल्यास तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यात येईल. या अनुषंगाने मा.संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठीचा प्रस्ताव सादर करण्यात येत असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

या अनुषंगाने चर्चा होऊन प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :-**

वरील प्रस्तावात नमूद केलेल्या जलमापकांचा पुरवठा एकत्रितरित्या एकच निविदा मागवून करुन घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच यासाठी येणारा खर्च महाराष्ट्र सुजल निर्मल कार्यक्रमांतर्गत निधी उपलब्ध करुन घेण्याचा प्रयत्न करावा, तसा प्रस्ताव शासनास सादर करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. दरम्यानचे काळात निविदा काढून खरेदी करण्याची प्रक्रिया सुरु करावी. सुजल निर्मल अभियानांतर्गत निधी उपलब्ध न झाल्यास मजीप्राने हा खर्च स्वनिधीतून करावा. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

कार्यक्रम बाब क्र.७:

विषय: महाराष्ट्र सुजल निर्मल अभियानांतर्गत मंजूर दर्यापूर शहर पा.पु.योजना.
**लोकवर्गणी मजीप्राने भरणेबाबत.**

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

दर्यापूर शहरासाठी सुजल निर्मल अभियानांतर्गत सुधारणा कामांच्या रु. ९८.७९ लक्ष ढोबळ किंमतीच्या प्रस्तावास शासनाच्या दि.२५.८.०९ च्या निर्णय क्र.सुनिअ-२००३/ प्र.क्र.२२४/पापु.२२ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, या योजनेसाठी रु.९,८७,९३०/- इतकी लोकवर्गणी नगरपरिषदेने उपलब्ध करण्याचे प्रशासकीय मान्यतेच्या शासन निर्णयात स्पष्ट केले आहे. तथापि, सदरचे पाणी पुरवठा केंद्र मजीप्रामार्फत चालविण्यात येत असून, पाणीपट्टीची वसुली मजीप्रामार्फत करण्यात येत असल्याने, ती मजीप्राने उपलब्ध करावी असे नगरपरिषदेने स्पष्ट केले आहे.

सद्य:स्थितीत ग्राहकांना देण्यात येत असलेल्या नळ जोडण्यासाठी ग्राहकांकडून लोकवर्गणी म्हणून अंदाजे रु.६.४३ लक्ष इतकी रक्कम जमा झाली आहे. म्हणजेच सध्या भरावयाची एकूण रु.९.८८ लक्ष रकमेतुन जमा रु.६.४३ लक्ष वजा जाता एकूण रु.३.४५ लक्ष इतकीच रक्कम प्रत्यक्षात मजीप्रास उपलब्ध करावी लागेल. सदर रक्कम नव्याने नळजोडण्या देताना उर्वरित ग्राहकांकडून उपलब्ध करुन घेणे सहज शक्य आहे.

त्याचप्रमाणे सदर योजनेची कामे हाती न घेतल्याने प्रशासकीय मान्यता रद्द करण्यात येईल असे शासनाने कळविले आहे. त्यामुळे सदरच्या प्रस्तावाची लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करुन देण्यास संचालक मंडळाची मान्यता घेण्यासाठी कार्यक्रम बाब सादर करण्यात येत असल्याचे मा.संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

सदर विषयाच्या चर्चेदरम्यान मा.सदस्य सचिव यांनी स्पष्ट केले की,म.जी.प्रा.च्या मालकीच्या अमरावती पाणी पुरवठा केंद्रातर्गत विशेष सहाय्य निधी मधून हाती घ्यावयाच्या कामासाठी लोकवर्गणी म.न.पाने उपलब्ध करण्याचे शासन निर्णयात स्पष्ट केले आह. तथापि, सदर योजना मजीप्राची असल्याने लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करणे अनिवार्य आहे. त्यामुळे लोकवर्गणी उपलब्ध करण्यास मा.संचालक मंडळाच्या मान्यतेची आवश्यकता नसल्याचे मुख्य अभियंता यांना कळविण्यांत आले होते. त्यानुसार योजनेच्या निविदा मागविण्यांत आल्या आहेत. तथापि, याच प्रकारच्या मजीप्राच्याच मालकीच्या असलेल्या दर्यापूर योजनेच्या निविदा मात्र लोकवर्गणी अभावी मुख्य अभियंता यांनी, अद्यापही मागविलेल्या नाहीत, व या योजनेच्या लोकवर्गणीसाठी संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी कार्यक्रम बाब सादर केली. यावर चर्चा करताना, मा.मंत्री तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. व राज्यमंत्री तथा उपाध्यक्ष, म.जी.प्रा. यांनी वेगवेगळ्या योजनांसाठी वेगवेगळी धोरणे वापरण्याची संबंधीत मुख्य व अधीक्षक अभियंत्यांची सदर कृती कामं टाळण्याची प्रवृत्ती दर्शविते असे मत व्यक्त करुन या प्रकाराबददल तीव्र नाराजी व्यक्त केली.

सदर कार्यक्रम बाबीवर चर्चा होऊन या कामासाठीची लोकवर्गणी मजीप्राने उपलब्ध करण्यास मान्यता प्रदान करण्यात येऊन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव:**

असा ठराव करण्यात येतो की, मजीप्राची योजना म्हणून पाणीपट्टी वसुलीसह

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

देखभाल दुरुस्ती करण्यात येत असलेल्या दर्यापुर पाणी पुरवठा योजनेंतर्गत सुजल निर्मल अभियानांतर्गत सुधारणा कामाच्या मंजूर प्रस्तावासाठी आवश्यक लोकवर्गणीची १०% इतकी रक्कम महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने उपलब्ध करुन देण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे. तसेच पुढे असाही ठराव करण्यात येतो की, मजीप्राच्या मालकीच्या वॉटर वर्क्सच्या सुधारणा कामांसाठी जेंव्हा जेंव्हा शासनाचे विविध योजनांतर्गत निधी उपलब्ध होईल अशा प्रकरणात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या लोकहिश्यापोटी भरावयाची रक्कम मजीप्राने भरावी. त्यासाठी पुन:पुन्हा स्वतंत्रपणे संचालक मंडळाचे मान्यतेची आवश्यकता असणार नाही. त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**कार्यक्रम बाब क्र.८:**

**विषय:** अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजना.
पाणी पुरवठा योजनेसाठी मंजूर विशेष सहाय्य निधितून योजनेची लोकवर्गणी मजीप्राने उभारण्याबाबत सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याबाबत.

सदर कार्यक्रम बाबीबाबत मा. सदस्य सचिव यांनी मा.संचालक मंडळास अवगत केले.

मजीप्राच्या मालकीच्या अमरावती पाणी पुरवठा योजनेंतर्गत कामे करण्यासाठी राज्य शासनाने विशेष सहाय्य निधी अंतर्गत दि.२१.१०.२०११ च्या शासन निर्णय क्र.सुनिअ-२०११/ प्र.क्र.४७८/पापु.२२ अन्वये रु. १४.२९ कोटी इतका निधी मंजूर केला असून, सदर मंजुरीनुसार रु. १.४३ कोटी लोकवर्गणीची रक्कम महानगरपालिकेने भरण्याचे शासन निर्णयात नमूद केले आहे. तथापि, सदर रक्कम भरण्यास मनपाने असमर्थता दर्शविली आहे.

तथापि, या योजनेची दैनंदिन देखभाल दुरुस्ती मजीप्रामार्फत करण्यात येत असून, पाणीपट्टी ही मजीप्रामार्फत वसुल करण्यात येत आहे. थोडक्यात, सदरची योजना ही मजीप्राच्या मालकीची असल्याने, दि.२१.१०.२०११ च्या शासन निर्णयानुसार मंजूर विशेष सहाय्य निधींअंतर्गत कामाच्या प्रस्तावासाठीची लोकवर्गणीची रक्कम रु.१.४३ कोटी मजीप्राने उपलब्ध करणे अनिवार्य आहे.

त्यामुळे सदर शासन निर्णयात लोकवर्गणीच्या संदर्भात अनुषंगिक बदल करण्यासाठीचा आवश्यक तो प्रस्ताव दि. २० एप्रिल, २०१२ च्या पत्र क्र.मजीप्रा/सस/तांशा-१/९८/५४७ अन्वये शासनास सादर करण्यात आला आहे.

तथापि, सदर कार्यवाहीस मा.संचालक मंडळाची मान्यता घेणे आवश्यक असल्याने, सदर प्रस्ताव मान्यतेसाठी सादर करण्यात येत असल्याचे मा. संचालक मंडळास अवगत करण्यात आले.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

या अनुषंगाने सदर प्रस्तावास मा.संचालक मंडळाने मान्यता प्रदान करुन पुढीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव :**

महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या मालकीची योजना म्हणून असलेल्या पाणी पुरवठा योजनेंतर्गत विशेष सहाय्य निधीतुन प्रस्तावित योजनेच्या लोकवर्गणीची रक्कम मजीप्राने भरणेबाबत मान्यता प्रदान करण्यात येत असून, तसा शासन निर्णयात अनुषंगिक बदल करण्यासाठी शासनास सादर केलेल्या प्रस्तावास कार्योत्तर मान्यता प्रदान करण्यात येत आहे. या अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यात येत आहे.

**आयत्या वेळच्या कार्यक्रम बाबी.**

कार्यक्रम बाब क्र.१

विषय: जिनॅप पाणी साठविण्याच्या प्रणालीबाबत. (G'NAP Water Storage Systems)

G'NAP Water Storage Systems ही प्रणाली/तंत्रज्ञान महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकरिता नवीन आहे. या नवीन तंत्रज्ञानाची म.जी.प्रा. मध्ये माहिती व वापर करण्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. या नवीन प्रणाली/तंत्रज्ञाना बाबत सविस्तर चर्चा झाली. या नवीन प्रणालीच्या वापराबाबतचा प्रस्ताव तांत्रिक सल्लागार समीतीच्या बैठकीत ठेवून निर्णय घेण्यात येणार आहे. म.जी.प्रा.च्या या कार्यवाहीस संचालक मंडळाने मान्यता दर्शविली. अशा प्रकारच्या पाणी साठवण प्रणाली ४-५ ठिकाणी प्रयोगात्मक पध्दतीने बसवून त्यांचे परिणामाचा अभ्यस करावा व तो संचालक मंडळासमोर सादर करावा.

कार्यक्रम बाब क्र.२

विषय: राज्य सार्वजनिक उपक्रमाने तात्पुरता शिल्लक निधी गुंतविण्यासाठी सुधारित मार्गदर्शक तत्वांच्या अनुषंगाने महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाने केलेल्या गुंतवणूकीस मान्यता मिळण्याबाबत.

सदर विषयी चर्चा करीत असताना ही बाब धारिकेमार्फत सादर न करता Table Item म्हणून का सादर करण्यात आली असे मा.राज्यमंत्री व उपाध्यक्ष यांनी विचारणा केली असता यावर असा खुलासा करण्यात आला की, शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुंबई-३२, दि.१३.३.२००६ व शासन निर्णय क्र.पीएसयु.१००५/सीआर.२६/पीएसयु/मंत्रालय, मुबई-३२, दि.२२.३.२००६ अवये सुधारीत मार्गदर्शक तत्वे निर्गमित झाली आहेत. यानुसार अल्प मुदतीच्या गुंतवणूकी सदस्य सचिव यांच्या मान्यतेने केली जातात व शासन निर्णयातील सूचनेनुसार अशा अल्प मुदतीच्या गुंतवणूकी संचालक मंडळाच्या प्रत्येक

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

बैठकीत मान्यतेसाठी सादर केल्या जातात. दीर्घ मुदतीच्या गुंतवणूकीसाठी शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे प्राधिकरणाच्या ९६ व्या बैठकीत समिती स्थापन करण्यात आली आहे. दीर्घ मुदतीच्या (१ वर्षाहून जास्त) गुंतवणूकीचे प्रस्ताव धारिकेव्दारे समितीच्या मान्यतेसाठी सादर केले जातात. समितीने मान्य केलेल्या गुंतवणूकी देखील संचालक मंडळाच्या प्रत्येक बैठकीमध्ये मान्यतेसाठी सादर केल्या जातात.

प्रस्तृत कार्यक्रम बाबीं मध्ये ७६ ते १९५ दिवस कालावधीसाठी केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव असनू ते सदस्य सचिव स्तरावर मान्यतेने केलेले आहेत. दि.११.०८.२०१२ ते २०.०९.२०१२ या कालावधीत दीर्घ मुदतीच्या गुंतवणकी केलेल्या नाहीत, म्हणून धारिका गूंतवणूक समितीकडे मान्यतेसाठी सादर झालेल्या नाहीत. मा.अध्यक्ष यांनी असे नमूद केले की दीर्घ मुदतीचे प्रस्ताव असल्यास धारिकेमार्फत समितीकडे मान्यतेसाठी सादर होत असतात. यावर सदस्य सचिव यांनी असे नमूद केले की, केलेल्या गुंतवणूकीचे प्रस्ताव शासन निर्णयानुसार असल्याने प्रस्ताव मान्य करण्यात यावा. चर्चेअंती पुढीलप्रमाणे ठराव सहमत करण्यात आला.

**ठराव**

**असा ठराव करण्यांत येतो की, दि. ११.०८.२०१२ ते १५.०९.२०१२ या कालावधीत केलेल्या अल्प मुदतीच्या गुंतवणूकीस मान्यता देण्यांत येत आहे.**

**कार्यक्रम बाब क्र.३**

**विषयः** महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील "वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी" या पदाच्या पदनामामध्ये बदल करण्याबाबत.

म.जी.प्रा.मध्ये "वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी" हे पद नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे शासन निर्णय दि.५.३.१९७९ अन्वये मंजूर करण्यांत आले आहे. सदर पदाचे पदनामात बदल करुन ते "संचालक (वित्त)" असे करण्याबाबत सदस्य सचिव यांनी संचालक मंडळास अवगत केले. यावर सविस्तर चर्चा होवून "वित्तीय सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी" हे पद शासनाने मंजूर केलेले असल्याने सदर पदाचे पदनामात बदल करावयाचा असल्यास त्यास शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे. त्यामुळे म.जी.प्रा.ने सदरचा प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी सादर करावा असे ठरले. सदरची कार्यवाही करण्यास सदस्य सचिव यांना प्राधिकृत करण्यांत आले.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**

**सदस्य सचिव,**
**म.जी.प्रा.**

(१२)

**आयत्या वेळीची चर्चा :**

अपर आयुक्त आदिवासी विकास विभाग, ठाणे यांनी त्यांचे पत्र क्र १०.०९.२०१२ अवये म.जी.प्रा.च्या मालकीची वागळे इस्टेट इमारत भाडे तत्वावर किंवा विकत देण्याबाबतची विनंती म.जी.प्रा.कडे केली आहे. ही बाब संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून दिल्यावर संचालक मंडळाने सदरची इमारत आदिवासी विभागास न देता म.जी.प्रा.स अधिक उत्पन्न मिळेल त्या दृष्टीने विचार करुन बी.ओ.टी. किंवा अन्य प्रस्ताव संचालक मंडळाकडे सादर करावे असे निर्देश दिले.

**मा.अध्यक्ष तथा मंत्री**
**पाणी पुरवठा व स्वच्छता**
**म.जी.प्रा.**

**सदस्य सचिव**
**म.जी.प्रा.**